

# रतनगड

लेखक:
संकल्प चौधरी

पुस्तकाचे नाव : रतनगड.

प्रकार : ट्रेक प्रवास वर्णन.

लेखक : संकल्प चौधरी (sanky.f1@gmail.com)


9821129287

छायाचित्रे : संकल्प चौधरी, मकरंद शिंदे , अमोल पाटील, प्रसाद राऊत.

नकाशा सौजन्य : trekshitiz.com

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
• हे ई-पुस्तक वेबसाइटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक अहे.
• या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा रुपांतर अथवा भाषांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे अवश्यक अहे.



# अर्पणपत्रिका


सर्वगुणसंपन्न छत्रपती शिवाजी महाराजांना

आणि सह्याद्रीला त्रिवार मुजरा करून

हे पुस्तक सर्व सहयप्रेमींना अर्पण करतो...

संकल्प चौधरी

# रतनगड



पाण्याची टाकी
गुहा
पाण्याचं टाकं
दरवाजा
खुट्याच्या खालुन येणारी वाट
पाण्याची टाकी
पाण्याचं टाकं
TreKshitiZ.com
गुहा
नेढं
पाण्याची टाकी
देऊळ असलेली गुहा
दरवाजा
गोल बुरुज
शिडीची वाट

२०१३ च्या ट्रेकिंग मोसमाची सुरूवात रतनगड पासून करायची हे २०१२ चा हंगाम संपता संपताच मनाशी पक्के केले होते आणि त्यानुसार सुमारे २ महिन्यांच्या उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर आम्ही लगेचच आमच्या ब्यागा प्याक केल्या आणि रतनगडचा रस्ता धरला.

सगळ्यांची ट्रेनची  बुकिंग करता करता आणि केलेली काही बुकिंग रद्द करेपर्यंत ट्रेकचा दिवस आला सुद्धा...

ठरल्याप्रमाणे  रात्री ठीक ११:४५ ला समीर मला दादर स्टेशनला भेटला. समीरचा हा पहिलाच ट्रेक असल्यामुळे तो खूपच उत्साहात होता ,तर दुसऱ्या बाजूला आदल्या दिवशीची नाईट शिफ्ट  आणि आजची १$^{st}$ शिफ्ट करून मी पार ढेपाळून गेलेलो. विश्रांतीची सक्त गरज मला भासत होती!!!!!!

स्टेशन वर चहापाणी होईपर्यंत गणेश आणि रघु पण येउन पोचले. आता वाट पाहत होतो ते आमच्या झुकझुक गाडीची !!!!!!

गाडी घेऊन आम्ही इगतपुरीच्या दिशेने वाटचाल सुरु केली , मधेच ठाण्याला थांबून इतर मंडळींना उचलले. नेहमीप्रमाणे सीट्स गोळा करून सगळेजण बसलो आणि गप्पांचा फड रंगला.

या सगळ्या नादात कल्याण कधी येउन गेले याचा पत्ताच लागला नाही. यानंतर मात्र सगळेच जण हळू हळू पेंगायला लागल्याने गप्पा सोडून आम्ही झोपायच्या तयारीला लागलो. अर्धवट झोपेत आणि अर्धवट जागे अशा अवस्थेत शेवटी आम्ही सकाळी ३:१० वाजता इगतपुरीला पोहोचलो.

## दिनांक - १६ जून २०१३

उतरल्यावर  फलाटावरच चहा - बिस्किटांचा ताबडतोब फडशा पाडला. रात्रीच्या अंधारात रस्त्यातले अगणित बेडूक चुकवत तडक यष्टी ष्ट्याण्ड गाठला आणि तिकडेच आडवे झालो.

आम्ही सगळे डाराडूर झोपले असताना रघु मात्र मच्छरांच्या हमल्यामुळे जागाच होता .........बिचारा रघु !!!!!

सकाळी श्रीकांतच्या गडबडीमुळे जाग आली मग तसाच काही वेळ बसून बाकीच्यांना उठवले आणि ५:१५ ची पुणे यष्टी पकडून भंडारदरयाकडे मार्गस्थ झालो. जसजसे आम्ही शहरी भागापासून दूर जात होतो तसतसे आजूबाजूला पसरलेले हिरवळीचे साम्राज्य आमच्या मनाचा ताबा घेत होते.

आमची गाडी घाटातली नागमोडी वळणे चढत चढत (चढली बुवा एकदाची... ) भंडारदरयाला पोचली.

इथवर येईपर्यंत सकाळचे सात वाजले होते. जवळच्याच टपरीवर गोलभजी आणि पेशल चहा मारला . ( हि टपरी Google Earth वर पण दिसते ………इति टपरीवाले काका ).



- पोटपूजा झाल्यावर तिकडेच बोटीची चौकशी केली असता समजला कि धरणात पाणी कमी असल्याने बोट बंद आहे …WTH ट्रेकच्या सुरवातीलाच solid disappointment, यामुळे तेव्हा उरलेला एकमेव पर्याय म्हणजे “जीप” पकडून रतनगडला निघालो.

वाटेत जाताना भंडारदरा धरण ,धुक्यात लपलेली अलंग -मदन - कुलंग ची रांग आणि जंगलातील हिरवळीवर मुक्तपणे बागडणाऱ्या मनमोहक लांडोर पाहिल्यामुळे जीपचा प्रवास सार्थकी लागल्यासारखा वाटलं.



**जंगलातील हिरवळीवर मुक्तपणे बागडणाऱ्या मनमोहक लांडोर पाहिल्यामुळे जीपचा प्रवास सार्थकी लागल्यासारखा वाटलं.....**

वाटेत मधेच जाळीत लपलेली करवंद दिसली, मग काय विचारता...... आम्ही सगळे गाडीतून खाली उतरून रानमेवा खाण्यात गर्क झालो.

रतनवाडीला पोचल्यावर परग्रहावरून आलेल्या alien ला पहिल्यासारखा look देणाऱ्या काकांना रस्ता विचारून वाटेला लागलो.



काकांना रस्ता विचारून वाटेला लागलो......

ऐन पावसाळ्याचे दिवस असल्याने नजर पोहोचेल तिथपर्यंत हिरवळच हिरवळ पसरली होती आणि सोबतीला शेतकऱ्यांनी नांगरून ठेवलेली शेत होतीच.

प्रवरा नदीच्या प्रवाहाबरोबर वाटचाल करता करता जंगल कधी सुरु झालं समजल पण नाही. विशेष म्हणजे पाऊस असूनही नदीचे पाणी अतिशय निर्मळ होते.



प्रवारा नदीचे पात्र......

नदी नागमोडी वळणे घेत वाहत असल्याने नदी ओलांडणे भाग होते. पाण्यातील कातळावर शेवाळे साचल्यामुळे कधी पाय सरकेल याचा नेम नव्हता.

नदीचे पात्र २-३ वेळा इकडून तिकडे ओलांडल्यावर आम्ही जंगलात घुसणाऱ्या मुख्य रस्त्याला लागलो.



नदी ओलांडताना आमचे वीर......

गावकऱ्यांनी दिलेल्या सरपणाच्या विशेष सूचनेमुळे वाटेतलीच २-४ ओंडके मजबूत श्रीकांत , मी आणि मक्याने उचलून घेतले.

वाटेत लागलेल्या पठारावर थोडावेळ थांबून पेटपूजा आणि फोटोग्राफीचे सोपस्कार आटपले.



गिरीभ्रमणचा ग्रुप.....

यापुढे भुरभुरणारा पाऊस अजून जोरात पडायला सुरवात झाली आणि दाट धुक्यामुळे ढगात पोहोचल्यासारखे वाटू लागले.

जंगलातून चालताना डोंगराचा चढ अंगावर येत होता, त्यातच सरपणासाठी घेतलेल्या लाकडांमुळे आम्हास अधिकच थकवा जाणवत होता.


वाटेत पुढे गेल्यावर एकेठिकाणी चौक लागला. चौकात एका गंजलेल्या फलकावर वाटांची नावे लिहून ठेवलीत. इथून उजवीकडील वाट साम्रडला जाते जी रतनगडच्या खुट्याच्या वाटेला मिळते. डावीकडील वाट तुम्हाला हरिश्चंद्रगडावर घेऊन जाते (१२ – १४ तास)




चौकातील दिशादर्शक फलक.....

यापुढचा थरार म्हणजे कातळात लावलेल्या शिड्या चढून गणेश दरवाजाने गडात प्रवेश करणे .

कातळावर कमीतकमी आधाराच्या मदतीने लावलेल्या लोखंडी शिड्यांवर Newcomers ची झालेली तारांबळ पाहून मला माझा पहिला ट्रेक आठवला. अशा डुगडुगणाऱ्या  शिड्यांवरून गडात येणे त्यांच्यासाठी एखाद्या दिव्यासारखे होते.



शिडीवरून वर येताना, मागे धुक्याने दाटलेली दरी.....

देउळ असलेली गुहा ओलांडून मोठ्या गुहेत जातो तर काय... totally unexpected ............. !!!!!! नाथुगडी म्हणून एक गावातलेच व्यक्ती चक्क घरगुती उपाहारगृह थाटून बसलेले (Which eventually proved to be a little costly affair ). नाथूकडील कटिंग चहा (15 Rs/ cutting ) प्यायलो आणि जेवणाचे डबे उघडले. गणेशने आणलेली बाजरीची भाकरी आणि गुळ  हा आमचा स्पेशल मेनू होता.



१७६३ साली हा किल्ला कोळी सरदार जावजी याने ताब्यात घेतल्याची गॅझेटमध्ये नोंद आढळते. १८१८ साली रतनगड पाच विभागांचे मुख्यालय होते. राजुरची ३६ खेडी, अलंगची २२ खेडी ही सह्याद्रीच्या वरची व सह्याद्रीच्या खालची सोकुर्ली परगण्याची ६० खेडी, वाडी परगण्याची २२ खेडी, जुरुश्रोशि परगण्याची ६० खेडी होती. १८२० मध्ये कॅप्टन गॉर्डनने गड ताब्यात घेतला. १८२४ साली तो आदिवासी सेनानी रामोजी भागंरेनी गड ताब्यात घेतला.

जेवण आटोपून गडफेरी साठी निघालो. दाट धुकं आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देत होतं त्यामुळे आजूबाजूला असणारे कात्राकडा आणि घनचक्कर यापैकी एकाचेही दर्शन दुरापास्त होऊन बसले. पावसाला आता जणू चेवच आला होता, पाऊस आणि सुसाट वारा याच भन्नाट combination प्रत्येक जण अंगाला टोचणाऱ्या सुयांच्या रुपात अनुभवत होता.

















निसर्गनिर्मित नेढे.....

गणेश दरवाजा , गोलबुरुज, खुट्याजवळचा कल्याण दरवाजा, निसर्गनिर्मित नेढ आणि परत गणेश दरवाजा अशी दुर्गभ्रमंती पूर्ण करून आम्ही गुहेत परत आलो. परत आल्यावर पुन्हा एक चहाची round झाली. कपडे बदलून आराम करत असतानाच इतर ग्रुप्स येउन दाखल झाले आणि गुहेची उरलेली जागा बळकावण्यात मग्न झाले..........

**आपण सगळ्यात आधी पोहोचल्यामुळे नो टेन्शन !!!!!!**

इतर मंडळी आपल्या दुखणाऱ्या पायांचे लाड करेपर्यंत आम्ही रात्रीच्या जेवणाची तयारी सुरु केली.

३ दगडांवर चूल थाटून मूगाच्या डाळीची खिचडी हा standard item बनवला , सोबत आणलेले पापड निखाऱ्यांवर भाजून घेतले. जेवणानंतर गुहेत जाऊन पडलो आणि स्वताला झोपेच्या आधीन केले.



## दिनांक - १७ जून २०१३

दुसऱ्या दिवसाची सकाळसुद्धा धुक्यात गुरफटलेली होती,हवेत मस्त गारवा पसरला होता आणि सोबतीला पाऊस भुरभुरत होताच ...... आन्हिक आटपून नाथुनी बनवलेल्या चहा आणि कांदेपोह्यांवर ताव मारला. सामान आवरून घेतले आणि निघण्याआधी शिवगर्जनेने गुहेचा परिसर दणाणून सोडला. खाली उतरताना चांगल्या पैकी स्पीड मेंटेन केलेला.

वाटेत आरश्याला देखील लाजवेल अस स्वच्छ पाणी असलेल्या प्रवरा नदीत डुबक्या मारल्या ........... रात्रभर झालेल्या पावसामुळे पाण्याचा जोर जरा जास्तच वाटत होता !!!! बाकी सर्व रस्ता गप्पा टप्पा करत करत पूर्ण झाला आणि आम्ही पुन्हा रतनवाडी गावात येऊन पोचलो.

यापुढील मुख्य आकर्षण म्हणजे अमृतेश्वर मंदिर !!!!!!!! साधारण १२०० वर्षा पूर्वीचे हे हेमाडपंथी मंदिर यादवकालीन स्थापत्यशास्त्राची ओळख करुन देते.



अप्रतिम कलाकुसरीने नटलेले अमृतेश्वर मंदिर.....





हे मंदिर म्हणजे हेमाडपंथी बांधकामाचा उत्कृष्ट नमुना आहे. मंदिरावर प्रचंड प्रमाणात कोरीव काम आढळते. यामध्ये यक्षकिन्नरच्या मूर्ती, पुराणातील प्रसंग, समुद्रमंथन, मुक्त शिल्पे यांचा समावेश आहे.


















मंदिराच्या बाजुलाच प्रशस्त अशी पुष्करणी आहे, यालाच विष्णुतीर्थ असे म्हणतात. यामधे विष्णु आणि गणपती यांनी शस्त्रे धारण केलेल्या मूर्त्या आहेत, तसेच विविध मूर्ती ठेवण्यासाठी कोनाडे देखील आहेत


देवदर्शनानंतर जवळच्याच एका घरात कपडे बदलून घेतले आणि जीप पकडून भंडारदरा गाठला. तिकडून ट्रेकिंग करीअर मधला १९ प्रवासी असलेला जीपचा प्रवास करून घोटीला पोहचलो. (ड्राईवर दादानुसार त्या जीप मध्ये एरवी ३० माणसे सहज बसतात .............. बाकी माणसे टपावर :-P) आमचा ड्राईवर तर अक्षरश न बसता गाडी चालवत होता. अशा या थरारक प्रवासानंतर शांतपणे एका सीटचे ज्यादा पैसे देऊन कसाऱ्याला पोचलो. कसाऱ्याला उतरून पेटपूजा केली आणि लोकल पकडून केलेल्या ट्रेकची उजळणी करत आपापल्या घरी पसार झालो.

## कसे पोहोचाल :

रतनवाडी हे गडाच्या पायथ्याचे गाव आहे.

इगतपूरी - घोटी - शेंडी मार्गे रतनवाडी गावात जाता येते. शेंडी गावातून रतनवाडीकडे जाण्यासाठी लाँच उपलब्ध आहेत तसेच शेंडी ते रतनवाडी अशी बससेवा देखील उपलब्ध आहे. भंडारदऱ्याहून वडप देखील उपलब्ध आहेत. गावातून गडावर जाण्यासाठी दोन वाटा आहेत.

या पैकी एक वाट ही गडाच्या डाव्या बाजूने जाते,हिला शिडीची वाट असेही म्हणतात.  दुसरी वाट ही रतनगड आणी खुट्ट्याच्या मधून आपणास गडावर घेऊन जाते.



## अविस्मरणीय क्षण –

- जंगलातील हिरवळीवर मुक्तपणे बागडणाऱ्या मनमोहक लांडोर .
- प्रवरा नदीतली मस्ती.
- नक्षीदार अमृतेश्वर मंदिर.
- नेढ.
- १९  सीटर चा प्रवास.

## रतनगडचे मुशाफिर -

संकल्प चौधरी.

मकरंद शिंदे.

प्रसाद पाटील.

श्रीकांत पाटील.

**नवे गडी**

कौस्तुभ शिंदे.

अमोल पाटील.

गणेश नरवडे.

रघु.

समीर अग्रवाल.


समाप्त